महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ 18 एप्रिल 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 290 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


## कृषी मंत्र्यांकडील बदल्यांचे अधिकार आयुक्तांकडे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** महाराष्ट्राच्या कृषी विभागातील अ धिक ाऱ्य ांच्य ा बदल्यांसदर्भात मोठा निर्णय घेण्यात आला आहे. कृषी मंत्र्यांकडे असणारे सर्व अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे अधिकार आता आयुक्तांकडे देण्यात आले आहेत. यात क्लास 1 क्लास 2 च्या अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. यासंदर्भातील सुधारित शासन निर्णय नुकताच समोर आला आहे. कृषी विभागात बदल्यांमुळे होणारा आर्थिक गैरव्यवहार थांबवावा आणि अधिकाऱ्यांना बदल्यांसाठी अधिकाराचे विकेंद्रीकरण आवश्यक असल्याचेही सांगितले जात होते. दरम्यान, गेल्या अनेक दिवसांपासून कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या वक्तव्यांमुळे राज्यात वाद वाढलेला असताना हा निर्णय समोर आल्याने चर्चा रंगली आहे.




राज्यातील कृषी विभागातील सर्वच बदल्या मंत्र्यांकडून नव्हे तर आयुक्तांकडून होणार आहे.महाराष्ट्राच्या कृषी विभागातील गट अ, ब, क व ड या चारही विभागातील कृषी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे अधिकार आता कृषी आयुक्तांकडे देण्यात आले आहेत. क्लास 1 व क्लास 2 च्या कृषी अधिकाऱ्यांचाही यात समावेश आहे. कृषी विभागात अधिकाऱ्यांच्या बदल्यांसाठी होणाऱ्या आर्थिक गैरव्यवहार थांबवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाने बदल्यांसाठी होणारे सत्तेचे विकेंद्रीकरण होत असल्याने या निर्णयाचे स्वागत केले जात आहे. कृषी विभागातील बदल्यांसंदर्भात होणारा राजकीय हस्तक्षेपाला नियंत्रण बसणार आहे. कृषी विभागात मागेल तिथे बदलीचे धोरण मंत्रालयातून चालत असल्याचा आरोप गेल्या अनेक दिवसांपासून होतो. मर्जीतील अधिकाऱ्यांच्या हव्या असलेल्या ठिकाणी बदल्यांच्या बदल्यात आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचा आरोपही झाला. दरम्यान, आता बदल्यांसदर्भात मंत्रालयातून हालणारी सूत्रे आता आयुक्तांच्या हाती देण्यात आल्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. बदल्यांसाठी 2005 मध्ये राज्यात स्वतंत्र कायदा अस्तित्वात आला आहे. सध्या या कायद्याला छेद देणारा जीआर काढला गेला आहे.

### भूसंपादन अधिनियमासंदर्भात सरकारचा मोठा निर्णय

**मत्रिमंडळाच्या बैठकीत महसूल विभागाने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी सरकारने भूसंपादनासाठी घेतल्यास त्याच्या मोबदल्यावर दिलं जाणारं व्याज आता कमी करण्यात आलं आहे.आधी शेतकऱ्यांना 15 टक्के व्याजदराने मोबदला मिळायचा, पण आता सरकारने तो दर कमी करून ९ टक्के केला आहे. म्हणजेच शेतकऱ्यांना आता पूर्वीपेक्षा कमी पैसे मिळणार आहेत. सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मिळणारा फायदा कमी होणार असला तरी सरकारचा मोठा खर्च वाचणार आहे. मात्र अनेक शेतकरी यामुळे नाराज होण्याची शक्यता आहे.**

थोडक्यात महत्वाचे

## घोडबंदर बनलाय मृत्यूचा सापळा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

घोडबंदर रस्ता प्रवासासाठी खूपच धोकादायक बनला आहे. या रस्त्यावर मागील सोळा महिन्यांत १५हून जास्त जणांचा अपघातांमध्ये मृत्यू झाला आहे. मृत्यू झालेल्यांमध्ये दुचाकीस्वार सर्वाधिक असून जखमींची संख्याही जास्त आहे. मृत्यूचा सापळा बनलेल्या घोडबंदर रोडच्या सध्याच्या स्थितीकडे प्रशासकीय यंत्रणा आणि लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करत आहे. पुरेशा मनुष्यबळाअभावी येथी वाहतूककोंडी दूर करणेही ठाणे वाहतूक शाखेला शक्य होत नाही.

वाहतुकीच्या दृष्टीने घोडबंदर रोड खूप महत्त्वाचा असून जेएनपीटी येथून गुजरातच्या दिशेने तसेच इतर विविध ठिकाणांवरून मोठ्या संख्येने अवजड वाहने घोडंबदर रोड मार्गे ये-जा करत असतात. त्याचबरोबर गेल्या काही वर्षांत घोडबंदर रोड परिसरातील लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. या भागातील नागरीक याच रस्त्याचा वापर करतात. त्यामुळे घोडबंदर रोडवर कायमच वाहनांची वर्दळ असली तरी जीवघेणा ठरू लागला आहे. या रस्त्यावर सातत्याने अपघात घडत आहेत. या दुर्घटनांमध्ये अनेकांचे बळी गेले आहेत. काहीवेळेला अपघाताला चालकाची चूक कारणीभूत असली तरी वाहतूक पोलिस, आरटीओ तसेच संबधित रस्ते प्राधिकरण अपघात टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यावर भर देत नसल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.

## मुंबई कारागृहाचा कोंडवाडा
### क्षमतेपेक्षा तीन पट अधिक कैदी




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** गेल्या काही वर्षात मुंबईत विविध प्रकारच्या गुन्ह्यांचे प्रमाण आणि गुन्हेगारांचीही संख्या वाढू लागली आहे. परिणामी, मुंबई मध्यवर्ती कारागृहात कैद्यांना ठेवण्यास आता जागा शिल्लक नसल्याचे स्पष्ट झाले. या कारागृहाची एकूण क्षमता ९९९ कैदी ठेवण्याची आहे. मात्र, सध्या कारागृहात ३,३६१ कैदी ठेवण्यात आल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. पुरेशी जागा आणि सोयी-सुविधांअभावी कारागृहात शिक्षा भोगणाऱ्यांची घुसमट होत आहे. या समस्येची राज्य मानवाधिकार आयोगानेही गंभीर दखल घेतली असून महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिवांना याबाबत नोटीस बजावण्यात आली आहे.

ब्रिटिश सरकारने १९२६ मध्ये मुंबईत आर्थर रोडवर ८०० कैद्यांची क्षमता असलेला तुरुंग उभारला. दरम्यान, १९७२ मध्ये या तुरुंगास केंद्रीय तुरुंग म्हणून घोषित करण्यात आले. या कारागृहात २०२१ मध्ये कैदी ठेवण्याची क्षमता वाढवून ९९९ करण्यात आली. मात्र, सध्या कारागृहात क्षमतेपेक्षा जवळपास तीन पट अधिक म्हणजेच ३ हजार ३६१ कैदी ठेवण्यात आले आहेत. माहिती अधिकार कार्यकर्ते संतोष घोलप यांनी याबाबत मुंबई मध्यवर्ती कारागृहाकडे माहिती मागितली होती. त्यानुसार कारागृह प्रशासनाने दिलेल्या माहितीतून संबंधित बाब समोर आली आहे. पुरेशी जागा नसल्याने कारागृहात विविध अडचणी निर्माण झाल्या आहेत.

### पुरेशी जागा नसल्याने कारागृहात विविध अडचणी

कैद्यांना झोपण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही, स्वच्छतेचा अभाव, अपुरी स्वच्छतागृहे, गुदमरणारे वातावरण, अपुरी आरोग्य सेवा यामुळे कैद्यांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. कारागृहात कैद्यांची गर्दी कारागृह व्यवस्थापनाच्या दृष्टीनेही गंभीर समस्या बनली आहे. कारागृहात अनेक वेळा कैद्यांमध्ये छोट्या छोट्या गोष्टींवरून वाद होतात. वादाचे परावर्तन हाणामारीत होते. याबाबत घोलप यांनी राज्य मानवाधिकार आयोगाला पत्र पाठवले होते. त्यांनतर राज्य मानवाधिकार आयोगाने महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावली. पुढील १० आठवड्यांमध्ये या प्रकरणी बाजू मांडण्याबाबत त्यांना सांगण्यात आले आहे.

## वाडा तालुक्यात भीषण पाणी टंचाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा :** उन्हाचा कडाका वाढल्याने वाडा तालुक्यातील दुर्गम भागातील गांव- पाडयांमद्ये मोठे "पाणी संकट" उभे राहिल्याने पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.मागील २०२४ वर्षाच्या तुलनेने यावर्षी (२०२५) फेब्रुवारी पासुनच भीषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे.दुर्गम भागांमधील विहिर, कुपनलिका यांच्या पाण्याची पातळी खाली गेल्याने त्या कोरड्या पडल्या आहेत, जल- जीवन मिशन, लघुनळ, ग्रामपंचायत नळ यांसारख्या पाणी योजना अनेक ठिकाणी अपूर्ण व नादुरुस्त आहेत. तर काही ठिकाणी अद्यापही कार्यान्वित नाहीत. त्यामुळे येथील नागरिकांची पाण्यासाठी मोठी भटकंती होतानाचे विदारक चित्र सध्या पाहावयास मिळत आहे.

वाडा तालुक्यातील सध्यस्थितीत ओगदा, डाहे, तुसे या तीन ग्रामपंचायतीमद्ये "भीषण पाणी टंचाई" निर्माण झाली आहे. तर उज्जैनी – आखाडा, उमरोठे (नदीपाडा), वरसाळे, कुयलू (तोरणे) या गावांत देखील पाणी टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असुन हि प्रस्तावित गावे असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान टंचाईग्रस्त भागातील पाण्याची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाकडून ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच यांच्याकडील माहितीच्या आधारे गांव पाड्यांना ३ ते ५ हजार लिटर क्षमतेच्या टाक्या उपलब्ध करून देत टँकरद्वारे नियमित पाणी पुरवठा केला जात असल्याची माहिती वाडा पंचायत समिती गटविकास अधिकारी वैभव शिंदे यांनी दिली आहे.

**वाडा तालुक्यामध्ये तीन गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा होत आहे. दोन टँकरच्या मदतीने प्रतिदिन सहा फेऱ्या केल्या जातात. ज्या गावांमध्ये पाणीटंचाई निर्माण होते तेथे प्रशासनाकडून तात्काळ उपाययोजना करत तेथे टँकर मंजूर करून पाणीपुरवठा केला जातो. तसेच ज्या गावांमध्ये बोरवेलला पाणी उपलब्ध होऊ शकतात तिथे बोरवेल घेण्यात येतात. आतापर्यंत १२ ठिकाणी बोरवेल घेण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर ११ नवीन लघु नळ योजनांचे काम पूर्ण झालेले आहे. तर १३ लघुनळ योजनांचे काम प्रगतीपथावर आहे.**

**– वैभव शिंदे, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, वाडा**

**यावर्षी फेब्रुवारी पासुनच तापमानात वाढ झाल्याने उन्हाचा कडाका प्रचंड वाढला आहे, याचा परिणाम मानव, पशु- पक्ष्यांना उन्हाचा त्रास सहन करावा लागत आहे. वाडा तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमद्ये जवळपास ८० -१०० घरकुल योजनां अंतर्गत कामे सुरू असल्याने त्याकरिता पाणी मोठ्या प्रमाणावर लागत असल्याने ते विहिर, कुपनलिका किंवा लघु नळ योजनेतील घेतले जाते.त्याचबरोबर नदी, नाले, विहिरी, कुपनलिका देखील बहुतांशी कोरड्या पडल्या आहेत. त्यामुळे दुर्गम भागात पाण्यासाठी मोठी वणवण व पायपीट करण्याची वेळ महिलांवर आली आहे. प्रशासनाने या गंभीर बाबीकडे लक्ष देणे गरजेचे आहे.**

## सरकारी शाळांतील समित्यांचे एकत्रिकरण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, ता. १७ :** राज्यातील जिल्हा परिषदेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये असलेल्या विविध प्रकारच्या १५ समित्यांचे एकत्रिकरण करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. या निर्णयामुळे शिक्षकांवरील कामाचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत मिळणार असल्याने राज्यातील शिक्षक संघटनांकडून याचे स्वागत केले जात आहे. तर हा निर्णय तूर्तास प्राथमिकच्या शाळांसाठी असून माध्यमिक स्तरावरील शाळांसाठी पुढील काळात निर्णय जाहीर केला जाणार आहे. १५ समित्यांमध्ये शाळा व्यवस्थापन समितीत माता पालक संघ, शालेय पोषण आहार योजना समिती, पालक शिक्षक संघ, नवभारत साक्षरता समिती, तंबाखू सनियंत्रण समिती आणि स्वयंमूल्यांकन समिती अशा सहा समित्यांचे विलीनीकरण करण्यात आले आहे. तर उर्वरित विद्यार्थ्यांच्या हितासंदर्भातील समित्या विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समितीत विलीनीकरण केल्या आहेत. यामध्ये विद्यार्थी सुरक्षा समिती, तक्रार पेटी समिती, शाळा बांधकाम समिती, परिवहन समिती, शाळा व्यवस्थापन व विकास समिती, शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी गावस्तर समिती या सहा समित्यांचा समावेश आहे

### दर दोन वर्षांनी समिती पुनर्गठित

**नव्याने विलीनीकरण करण्यात आलेल्या समित्यांमुळे शाळा स्तरावर शाळा व्यवस्थापन समिती, सखी सावित्री समिती, महिला तक्रार निवारण समिती, अंतर्गत तक्रार समिती, विद्यार्थी सुरखा व भौतिक सुविधा विकसन समिती याच कार्यरत राहतील. शाळा व्यवस्थापन समिती ही १२ ते १६ सदस्यांची असेल, यात ७५ टक्के बालकांचे आई-वडील असतील. उर्वरित स्थानिक प्राधिकरण, शिक्षक, मुख्याध्यापक आदींचा समावेश असेल. या समितीची बैठक दरमहा होईल तर दर दोन वर्षांनी समिती पुनर्गठित होईल.**

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मेट्रो ७ च्या भुयारी बोगद्याचे ' ब्रेक थ्रू ' यशस्वीरित्या पूर्ण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. १७:** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (टी २) ते अंधेरी पूर्व या मेट्रो मार्ग ७ अ मधील १.६५ किलोमीटर लांबीच्या भुयारी बोगद्याचे ' ब्रेक थ्रू ' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले. यावेळी कौशल,रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार पराग अळवणी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त संजय मुखर्जी, अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवातीला संबंधित अधिकाऱ्यांकडून प्रकल्पाविषयी माहिती जाणून घेतली. तसेच कळ दाबून 'ब्रेक थ्रू' कामाला सुरुवात केली. यानंतर या कामाची पाहणी केली. हा भुयारी बोगदा मेट्रो ७ अ वर डाऊनलाईन वर आहे. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ स्टेशन ते एअरपोर्ट कॉलनी स्टेशन दरम्यान हा बोगदा असणार आहे. ही मेट्रो जोडणे मुंबई महानगर प्रदेशातील एकूण मेट्रो जाळ्यासाठी महत्त्वाचा टप्पा असणार आहे. या मेट्रो मार्गामुळे मुंबई महानगर क्षेत्रातील मीरा-भाईंदर व पुढे वसई - विरार हा भाग छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळासोबत मेट्रोने जोडले जातील. तसेच ठाणे व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुद्धा मेट्रो ने जोडण्यात येईल. या मेट्रो मार्गाचे ५९ टक्के काम पूर्ण झाले आहे.



या मेट्रो मार्गाची लांबी ३.४ किलोमीटर असून त्यापैकी उन्नत मार्ग ०.९४ किलोमीटर आणि भूमिगत २.५० किलोमीटर आहे. या मार्गावर दोन स्थानके असणार आहेत. एक स्थानक उन्नत मार्गावर एअरपोर्ट कॉलनी तर दुसरे स्थानक भूमिगत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे असणार आहे. उन्नत मेट्रो मार्ग ०.५७ किलोमीटर असेल दुहेरी बोगद्याची लांबी २.०३५ किलोमीटर आहे. १ सप्टेंबर २०२३ रोजी डाउनलाईन बोगद्याचे पहिले ड्राईव्ह सुरू झाले. या बोगद्याची लांबी १.६५ किलोमीटर असून लाइनिंगसाठी ११८० रिंग्स बसविण्यात आल्या आहेत. बोगद्याचा व्यास ६.३५ मीटर एवढा असून सहा भागात विशेष डिझाईन असलेल्या प्रिकास्ट रिंग वापरण्यात आल्या आहेत.






## केईएम रुग्णालयाचे कर्मचारी वेतनापासून वंचित




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** केईएम रुग्णालयामध्ये २००९-१० पासून रोजंदारी व २०१६-१७ पासून बहुउद्देशीय कामगार चतुर्थश्रेणी पदावर कार्यरत आहेत. मात्र या कर्मचाऱ्यांचे मागील दोन महिन्यांचे वेतनच झालेले नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा मोठा पेच निर्माण झालेला आहे. उसनवारीने व वाढीव व्याजदराने कर्ज घेऊन ते कसाबसा आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे २२ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता सर्व रोजंदारी व बहुउद्देशीय कामगारांनी केईएम रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. संगीता रावत आणि सर्व अधिकाऱ्यांना गुलाब पुष्प देऊन गांधीगिरीने आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.

केईएम रुग्णालयामध्ये रोजंदारीवर १५३, तर बहुउद्देशीय कामगार म्हणून २५० कर्मचारी कार्यरत आहेत. हे कर्मचारी नियुक्त झाल्यापासून आपले काम इमानेइतबारे करीत आहेत. मात्र केईएम रुग्णालय प्रशासनाने या कर्मचाऱ्यांना फेब्रुवारी व मार्च महिन्याचे वेतन एप्रिलचा पहिला पंधरवडा उलटला तरी अद्यापपर्यंत दिलेले नाही. त्यामुळे घराचे भाडे, वीजदेयक, घर खर्च, मुलांचे शिक्षण, आई-वडिलांच्या औषधाचा खर्च कसा भागवायचा असा प्रश्न या कर्मचाऱ्यांना पडला आहे.

मागील दोन महिने काम करूनही वेतन न मिळाल्यामुळे त्यांना उसनवारीने व वाढीव व्याजदराने कर्ज घेऊन आपला उदरनिर्वाह चालवावा लागत आहे. त्यामुळे केईएम रुग्णालयात कार्यरत असलेले रोजंदारीवरील १५३, तर बहुउद्देशीय २५० कर्मचाऱ्यांनी २२ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता रुग्णालयाच्या परिसरामध्ये गांधीगिरी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार केईएम रुग्णालयातील अधिष्ठाता डॉ. संगीता रावत आणि अधिकाऱ्यांना गुलाब पुष्प देऊन आंदोलन करण्यात येणार आहे. तसेच मुंबई महापालिकेकडून देय असलेले वेतन व अन्य सेवा सवलती यापुढे वेळेत मिळाव्यात अशी विनंती यावेळी कर्मचाऱ्यांकडून करण्यात येणार असल्याची माहिती म्युनिसिपल मजदूर युनियनचे सहाय्यक सरचिटणीस प्रदीप नारकर यांनी दिली.

# गीतासार



## अध्याय ८
## अक्षरब्रह्मयोगः

यदक्षरं वेदविदो वदन्ति विशन्ति यद्यतयो वीतरागाः । यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत्ते पदं सङ्ग्रहेण प्रवक्ष्ये ॥ ८-११ ॥

वेदवेत्ते विद्वान ज्या सच्चिदानंदघनरूप परमपदाला अविनाशी म्हणतात, आसक्ती नसलेले यत्नशील संन्यासी महात्मे ज्याच्यामध्ये प्रवेश करतात आणि ज्या परमपदाची इच्छा करणारे ब्रह्मचारी ब्रह्मचर्याचे आचरण करतात, ते परमपद मी तुला थोडक्यात सांगतो. ॥ ८-११ ॥

सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च । मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् ॥ ८-१२ ॥

ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् । यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥ ८-१३ ॥

सर्व इंद्रियांची द्वारे अडवून मनाला हृदयाच्या ठिकाणी स्थिर करून नंतर जिंकलेल्या मनाने प्राण मस्तकात स्थापन करून परमात्मसंबंधी योगधारणेत स्थिर होऊन जो पुरुष ॐ या एक अक्षर रूप ब्रह्माचा उच्चार करीत आणि त्याचे अर्थस्वरूप निर्गुण ब्रह्म जो मी आहे त्याचे चिंतन करीत देह टाकून जातो, तो परम गतीला प्राप्त होतो. ॥ ८-१२, ८-१३ ॥


अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः । तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥ ८-१४ ॥

हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), जो पुरुष माझ्या ठिकाणी अनन्यचित्त होऊन नेहमी मज पुरुषत्तमाचे स्मरण करतो, त्या नित्य माझ्याशी युक्त असलेल्या योग्याला मी सहज प्राप्त होणारा आहे. ॥ ८-१४ ॥

मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम् । नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः ॥ ८-१५ ॥

परम सिद्धी मिळविलेले महात्मे एकदा मला प्राप्त झाल्यावर दुःखांचे आगार असलेल्या क्षणभंगुर पुनर्जन्माला जात नाहीत. ॥ ८-१५ ॥

# खाद्य संस्कृती
## प्रोटीनयुक्त पदार्थ





प्रोटीन्सची कमतरता अनेक महिलांमध्ये आणि लहान मुलांमध्ये दिसून येते. शाकाहारी लोकांच्या शरीरात तर प्रोटीन्सची कमतरता असण्याचं प्रमाण खूप जास्त आहे. त्यामुळे मग कित्येक लोक आहारावर लक्ष केंद्रित न करता प्रोटीन शेक किंवा प्रोटीन सप्लिमेंट्स घ्यायला सुरुवात करतात. पण आपल्या घरातच असे काही पदार्थ असतात जे योग्य प्रमाणात नियमितपणे घेतले तर शरीरातली प्रोटीन्सची कमतरता दूर होऊ शकते. ते पदार्थ नेमके कोणते ते पाहूया...आहारतज्ज्ञ शिखा अग्रवाल यांनी याविषयीचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला असून त्या सांगतात की भोपळ्याच्या बिया हा प्रोटीन्सचा एक चांगला स्रोत आहे.

२८ ग्रॅम एवढ्या भाजलेल्या भोपळ्याच्या बियांमधून ५ ग्रॅम प्रोटीन्स तर मिळतातच. पण त्यासोबतच व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम, ॲण्टीऑक्सिडंट्सही मिळतात.प्रोटीन्स मिळण्यासाठी मटारचे दाणेही खायला हवे. त्यातून फायबर, फोलेट, व्हिटॅमिन के देखील चांगल्या प्रमाणात मिळते. क्विनोआमधूनही चांगल्या प्रमाणात प्रोटीन्स मिळतात.

१ वाटीभर क्विनोआ खाल्ल्यास त्यातून ८ ग्रॅम प्रोटीन्स मिळतात.शिजवलेले छोले किंवा चणे जर तुम्ही वाटीभर खाल्ले तर त्यातूनही १५ ग्रॅम प्रोटीन्स मिळतात. याशिवाय त्यातून लोह आणि मॅग्रेशियमही चांगल्या प्रमाणात मिळते.शिजवलेल्या डाळींमधूनही प्रोटीन्स चांगल्या प्रमाणात मिळते. त्यामुळे दररोज वाटीभर वरण किंवा आमटी तरी खायलाच हवी.

# महाराष्ट्राचे दुसरे ‘भारतरत्न’ मानकरी
# पांडुरंग वामन काणे

आजपर्यंत महाराष्ट्रातून मोजक्याच मान्यवरांना भारतरत्न या सर्वोच्च नागरी सन्मानानं गौरवलं गेलं आहे. 1958 साली महाराष्ट्रातून महर्षी कर्वे या पुरस्काराचे पहिले मानकरी ठरले. महाराष्ट्राला दुसरं भारतरत्न मिळालं 1963 साली महामहोपाध्याय पांडुरंग वामन काणे यांच्या रूपानं.



संस्कृत, धर्मशास्त्र, भारतीय विद्या (म्हणजे इंडोलॉजी), हिंदू तसंच मुस्लीम कायदा, याबरोबरच फ्रेंच आणि जर्मन भाषेचा अभ्यास असलेल्या पां. वा. काणे यांचा जन्म 7 मे 1880 मध्ये चिपळूणमधल्या पेढे परशुराम इथं झाला. दापोलीत शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी महाविद्यालयीन शिक्षणासाठी मुंबईचा रस्ता धरला. 'हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र' या आपल्या ग्रंथासाठी काणेंना अनेक सन्मान मिळाले. पण फक्त एक अभ्यासक म्हणून त्यांची ओळख मर्यादित नव्हती. चिपळूणच्या सरकारी शाळेपासून ते भारतरत्न पुरस्कारापर्यंतच्या डॉ. काणेंच्या प्रवासावर एक नजर टाकूया.

### 1) शिक्षणक्षेत्रात भरीव कामगिरी

M.Aनंतर काणेंनी कायद्याकडे वळत LLMसुद्धा पूर्ण केलं. स्वतः उच्चशिक्षित असलेल्या काणेंनी शिक्षक म्हणूनही मोठं काम केलं. रत्नागिरीच्या सरकारी शाळेपासून सुरूवात करत डॉ. काणेंनी शिकवण्यासाठी मुंबई गाठली. मुंबईत सरकारी शाळेत शिक्षक म्हणून काम केल्यानंतर काही काळात त्यांनी एल्फिन्स्टन आणि विल्सन यांसारख्या महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक म्हणून काम केलं.

शैक्षणिक जीवनात भाऊ दाजी पारितोषिक, दक्षिणा फेलोशिप, झाला वेदान्त पारितोषिक, मंडलिक सुवर्णपदक यांसारखे अनेक सन्मान त्यांनी मिळवले.

मुंबईच्याच गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमध्ये सुद्धा त्यांनी शिकवलं होतं. भारतातल्या सर्वांत जुन्या विद्यापीठांपैकी एक अशा मुंबई विद्यापीठाच्या उपकुलगुरूपदाचाही कार्यभार त्यांनी 1947 ते 1949दरम्यान सांभाळला.

### 2) वकिली आणि संशोधन

"शिक्षण पूर्ण केल्यानंतर काणेंनी मुंबईतच वकिली सुरू केली. मुंबईत असताना काणे गिरगावात राहत असत. ट्रामनं प्रवास करण्याचा तो काळ होता. ते कोर्टात वकिली करत आणि एशियाटिक सोसायटीच्या लायब्ररीत आपला इतर अभ्यास करत असत," त्यांच्या कार्याबद्दल बोलताना संस्कृतचे अभ्यासक डॉ. गणेश उमाकांत थिटे यांनी सांगितलं. 'हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र' हा काणेंनी लिहिलेला ग्रंथ आजही प्राचीन भारतीय कायदेव्यवस्था आणि नियमावलीबाबत प्रमाण मानला जातो.

"कायदा या अर्थानं 'धर्म' हा शब्द इथे आलेला आहे. प्राचीन तसंच मध्ययुगीन भारतात धार्मिक आणि नागरी कायदेव्यवस्था कशी होती याबाबतचा ज्ञानकोषच एकप्रकारे डॉ. काणेंनी तयार केला होता. आजही या विषयाच्या अभ्यासासाठी या ग्रंथाला पर्याय नाही," असंही डॉ. थिटेंनी सांगितलं.

"पाच खंडांत लिहिलेला हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र हा ग्रंथ 1962 मध्ये लिहून पूर्ण झाला होता. पण सगळे खंड लिहून झाल्यानंतर डॉ. काणेंनी पुन्हा पहिल्या खंडाची सुधारित आवृत्ती काढण्याचं काम हातात घेतलं. इतकी त्यांची कामाप्रती निष्ठा होती," भांडारकर प्राच्यविद्या परिषदेचे रजिस्ट्रार प्राध्यापक श्रीनंद बापट यांनी बीबीसी मराठीशी बोलताना हे सांगितलं. काणेंचा हा ग्रंथ भांडारकर संस्थेनेच प्रकाशित केला होता.

### 3) समाजसुधारणा

फक्त शिक्षण आणि संशोधनच नव्हे तर समाजसुधारणा आणि पुरोगामी विचारांचा पुरस्कार हे ही डॉ. काणेंचं वैशिष्ट्य म्हणावं लागेल.

**लेखक**
**सिद्धनाथ गानू**

हिंदू आणि मुस्लीम कायद्यांचा सखोल अभ्यास, तसंच भारतीय कायदे आणि रुढींचा अभ्यास असलेल्या डॉ. काणेंनी तत्कालीन अनिष्ट चालींविरुद्ध आवाज उठवला होता.

केशवपन म्हणजे विधवांना केस कापून टाकण्याची सक्ती करणं, अस्पृश्यता यांसारख्या रुढींना त्यांनी तीव्र विरोध केला. एका केस न काढलेल्या विधवेला पंढरपुरात विठ्ठलाची पूजा करण्याचा अधिकार मिळावा यासाठी त्यांनी तिचं वकीलपत्र घेतलं होतं.

आंतरजातीय विवाह, विधवाविवाह तसंच घटस्फोटाचा अधिकार याचाही त्यांनी पुरस्कार केला. पण वकिली आणि शिक्षणक्षेत्रात सक्रीय असणाऱ्या काणेंनी प्रत्यक्ष राजकारणात सहभाग घेतला नाही. 1953 ते 1959 या काळात त्यांची राज्यसभेवर नियुक्ती झाली होती. राष्ट्रपतींद्वारे नेमण्यात येणाऱ्या 12 सदस्यांमध्ये त्यांचा सहभाग होता.

### 4) भारतीय विद्यांचा अभ्यास आणि प्रसार

भारतीय विद्या किंवा इंडोलॉजी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शाखेचा ( ज्यात भारतीय इतिहास, वाङमय, तत्त्वज्ञान आणि संस्कृती यांचा अभ्यास केला जातो ) डॉ. काणे यांचा अभ्यास होता. ओरिएंटल सायन्सेस म्हणजे पौर्वात्य विद्यांबद्दल भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदांमध्येही त्यांनी भारताचं प्रतिनिधित्व केलं.

1948 साली पॅरिस, 1951 साली इस्तंबूल आणि 1954 साली केंब्रिजमध्ये भरलेल्या प्राच्यविद्या परिषदांमध्ये त्यांनी सहभाग घेतला होता. तसंच वॉल्टेअर इथं 1953 साली भरलेल्या भारतीय इतिहास परिषदेचेही ते अध्यक्ष होते. 1959 साली त्यांची भारतविद्येचे म्हणजे इंडोलॉजीचे राष्ट्रीय प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली.

ज्या एशियाटिक सोसायटी आणि भांडारकर संस्थेच्या सहाय्यानं त्यांनी आपलं संशोधन आणि लिखाण केलं त्या संस्थांमध्ये ते नंतर पदाधिकारीही होते. तसंच महाराष्ट्र साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिलं.

### 5) पुरस्कार आणि ग्रंथसंपदा

काणेंनी संस्कृत साहित्य आणि इतर अनेक विषयांवर विपुल लेखन केलं. कालिदासाच्या धार्मिक आणि तत्वज्ञानविषयाक कल्पना, विदर्भ आणि महाराष्ट्र, हिंदू कायद्याचा वैदिक मूलाधार यांसारख्या अनेक विषयांवर त्यांनी लेखन केलं होतं. एशियाटिक सोसायटीनं संशोधन क्षेत्रात विशेष कामगिरीसाठी 'काणे सुवर्णपदक' द्यायला सुरूवात केली आहे.

संस्कृत आणि इतर भारतीय विषयांच्या अभ्यासासाठी ब्रिटिश सरकारनं डॉ. पां. वा. काणेंचा 1942 साली महामहोपाध्याय ही पदवी देऊन गौरव केला. अलाहाबाद आणि पुणे विद्यापीठानंही 1942 आणि 1960 साली त्यांना डी. लिट् पदवी देऊन सन्मानित केलं.

हिस्टरी ऑफ धर्मशास्त्र या त्यांच्या ग्रंथाच्या चौथ्या खंडाला 1956 साली साहित्य अकादमी पारितोषिक मिळालं होतं.

केवळ भारतातच नाही तर भारताबाहेरही त्यांच्या कार्याचा गौरव केला गेला. 1951मध्ये 'लंडन स्कूल ऑफ ओरिएंटल स्टडीज' या संस्थेनं त्यांना आपली फेलोशिप बहाल केली. 1958 साली त्यांना संस्कृत भाषेचे विद्वान म्हणून राष्ट्रपतींचं प्रशस्तिपत्रही देण्यात आलं.

1963 साली त्यांना भारतरत्न या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरवलं गेलं.

# भारतातील पहिली प्रवासी रेल्वे

भारतात पहिली प्रवासी रेल्वे गाडी रुळांवरून धावली ती 16 एप्रिल 1853 रोजी मुंबई आणि ठाणे यांच्या दरम्यान. रेल्वे वाहतुकीची योजना 1832 मध्ये मांडण्यात आली. त्यानंतर प्रत्यक्षात भारतातील पहिली रेल्वे 22 डिसेंबर 1851 रोजी रुडकी येथे धावली. ती बांधकाम साहित्य वाहून नेण्यासाठी वापरण्यात आली. मुंबई ते कोलकाता हा सुमारे सहा हजार चारशे किलोमीटर लांबीचा लोहमार्ग 1870 मध्ये तयार झाला. भारतात लोहमार्गाचे जाळे सध्या अंदाजे त्रेसष्ट हजार किलोमीटरचे आहे. देशात एकूण सुमारे आठ हजार रेल्वे स्थानके आहेत. युरोपात आगगाडी धावली ती 1830 मध्ये. नंतर चौदा वर्षांनी महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्यापारी, समाजसेवक, शिक्षणप्रेमी नाना जगन्नाथ शंकरशेट यांनी हिंदुस्थानात आगगाडी सुरू करावी, असा प्रस्ताव मांडला व पाठपुरावा केला. म्हणून त्यांना आधुनिक मुंबईचे शिल्पकार म्हणू लागले. ब्रिटिशांनी त्यांचा ठराव मान्यही केला. नाना शंकरशेट यांनी त्यांच्या वाड्यातील जागाही रेल्वेच्या पहिल्या कचेरीसाठी देऊ केली.

गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंग यांनी खासगी व्यावसायिकांना रेल्वे सुरू करण्यासाठी 1844 मध्ये परवानगी दिली. त्यानुसार दोन कंपन्यांची स्थापना करण्यात आली. गोऱ्यांचा हा ‘चाक्या म्हसोबा’ हिंदुस्थानातील पहिल्या वहिल्या रेल्वे प्रवासाला बोरिबंदर स्थानकातून दुपारी 3 वाजून 30 मिनिटांनी निघाला तो ठाण्याच्या दिशेने. गाडी साहीब, सिंध आणि सुलतान या इंजिनांनी खेचत नेली. गाडीला तोफांची सलामी देण्यात आली. मुंबई ते ठाणे हे चौतीस किलोमीटर अंतर कापण्यास गाडीने एक तास बारा मिनिटे घेतली. लोकांनी गाडीला चाक्या म्हसोबा असे नावही दिले. या गाडीमध्ये अंदाजे 400 लोक प्रवास करत होते. तसेच या गाडीत पंचवीस व्हीआयपी प्रवासी होते. त्यामध्ये नाना शंकरशेठ स्वत:ही होते. रेल्वे सुरू करण्यात नानांचे योगदान मोठे होते. त्याबद्दल त्यांना पहिल्या वर्गाचा ‘सोन्याचा पास’ देण्यात आला होता. महाराष्ट्रात रेल्वेची सातशे स्थानके आहेत. त्यांपैकी शंभर स्थानके मुंबई आणि उपनगरांतच आहेत. रेल्वेच्या एकूण उत्पन्नापैकी चाळीस टक्के वाटा महाराष्ट्राचा आहे.

रेल्वेसदृश्य वाहतुकीचे पहिले पुरावे जुन्या ग्रीसमध्ये सापडतात. नॅरोगेज रेल्वे युरोपातील कोळसा खाणींमध्ये सोळाव्या शतकात वापरात होत्या. त्यांचे रुळ लाकडी असायचे. युरोपात प्रवासी रेल्वे रुळावर आली ती 1830 साली. ती रेल्वे वाफेच्या इंजिनावर पळत असे. इंग्लंडमध्ये अठराव्या शतकाच्या आरंभी वाफेच्या इंजिनाचा शोध लावला गेला. जगातील पहिली आगगाडी इंग्लंडमधील मँचेस्टर ते लिव्हरपूल दरम्यान धावली. रेल्वेसाठी वापरण्यात आलेल्या रुळांमधील अंतर नंतर जगभर मापदंड म्हणून वापरले गेले आहे.



# सामाजिक जाणिवेच्या ‘चन्ने कुटुंबाचा आदर्श’




**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता**
**झिडके-अंबाडी** : शहापूर तालुक्यातील वासिंद येथील " चन्ने " कुटुंबातील प्रविण नारायण चन्ने वय वर्ष-44 यांचे उच्च रक्तदाब विकाराने डोंबिवली मधील " एम्स " या खाजगी रूग्णालयात मेंदूतील अती रक्तस्रावामुळे निधन झाले. निधनानंतर मयत प्रविण यांचे शरीर निरोगी धष्टपुष्ट असल्यामुळे येथील डॉक्टरांनी चन्ने कुटुंबियांना विश्वासात घेऊन सल्ला दिला की,मयत प्रविण यांच्या शरीराचे महत्त्वपूर्ण अवयव अत्यंत चांगले आहेत,जर काही आपण हे अवयव दान केलेत, तर एखाद्या जिवंत गरजू व्यक्तिला त्याचा फायदा होऊन आपण एकप्रकारे राष्ट्रीय विज्ञानवादी दृष्टीकोन स्वीकारणाऱ्या आदर्श विज्ञानवादी समाजाचा आदर्श भविष्यात ठराल.हा सल्ला डोंबिवली येथील एम्स रुग्णालयातील डॉक्टरांचा मान्य करून, मयत प्रविण यांचे डोळे,किडनी,फुफ्फुस व इतर अवयव दान करण्याचा निर्णय " चन्ने " कुटुंबियांनी घेतल्यानंतर सदरचे शारीरिक अवयव ज्युपिटर हॉस्पिटल ठाणे,डी.वाय्. पाटील हॉस्पिटल पुणे,नानावटी हॉस्पिटल मुंबई व फोर्टीज हॉस्पिटल मुलुंड आदि गरजू हॉस्पिटलमध्ये देण्यात आले.

सदर या दूरदृष्टी आणि विज्ञानवादी चन्ने कुटुंबाचा आदर्श यापुढे समाजापुढे राहणारच,त्याचे अनुकरण इतरांकडूनही करण्यात यावेत,हा संदेश या घटनेमागचा आहे. हे चन्ने कुटुंब शहापूर तालुक्यातील खर्डी येथील मुळरहिवासी असून,आंबेडकरी चळवळीतील वारसा जपणारे आहे,हे देखील सर्वश्रुत आहे.

# बालकांवरील लैंगिक अपराधास प्रतिबंध करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे
## - नयना अर्जुन गुंडे

**ठाणे** : पुणे जिल्ह्यातील आळंदी व ठाणे जिल्ह्यातील खडवली येथे बेकायदेशीर बालगृहे, वसतिगृहे, अनाथाश्रम चालविले जात असल्याबाबतच्या बातम्या प्रकाशित झालेल्या आहेत. वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झालेल्या बातम्यानुसार तसेच या संस्थांमध्ये बालकांना अनधिकृतपणे डांबून ठेवण्यात येवून त्यांचे शारिरीक, मानसिक आणि लैंगिक शोषणाच्या घटना घडत असल्याबाबतच्या बातम्या प्रसिध्द झाल्याबाबत निदर्शनास येत आहे. ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असून बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम 2015 आणि सुधारित अधिनियम 2021 तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम 2018 मधील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या आहेत. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम 2015 आणि सुधारित अधिनियम 2021 मधील कलम 42 नुसार मान्यता तथा सोबतच्या नोंदणी प्रमाणपत्राप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त नसलेली संस्था अथवा अशी संस्था चालविणाऱ्या व्यक्तीला 1 वर्ष कारावास तसेच रुपये 1 लक्ष पेक्षा कमी नसेल एवढा दंड किंवा दोन्हीही करण्यात येईल, अशी तरतूद नमूद करण्यात आली आहे.

तरी, आपल्या आसपासच्या परिसरामध्ये अनधिकृत संस्था आढळून आल्यास जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तसेच चाईल्ड हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक 1098 वर संपर्क साधून बालकांवरील शारिरीक तसेच लैंगिक अपराधास प्रतिबंध करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणेच्या आयुक्त नयना अर्जुन गुंडे (भा.प्र.से) यांनी केले आहे.

# एसटीचे टिकीट दाखवा आणि मिळवा मोफत नेत्र तपासणी

**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता**
**मुरबाड** : मुरबाड तालुक्यांतील नामांकित इन्फिगो आय केअर हॉस्पिटल मुरबाड यांच्या माध्यमातून व परिवहन महामंडळ मुरबाड यांच्या सहकार्याने मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागात एसटीने प्रवास करणाऱ्या सर्व प्रवाशांसाठी १० एप्रिल ते ३० मे २०२५ या कालावधीमध्ये एसटीने प्रवास करणाऱ्या सर्व प्रवाशांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे. यासाठी प्रवाशांनी आपल्या एसटीचे तिकीट हॉस्पिटलमध्ये दाखवल्यास त्यांना परिपूर्ण मोफत नेत्र तपासणी केली जाईल असे आश्वासन इन्फिगो आय केअर हॉस्पिटलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. श्रीधर ठाकूर यांनी दिली असून या अभियानात ग्रामीण भागातील एसटीने प्रवास करणाऱ्या सर्व प्रवासांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवून आपल्या डोळ्यांची तपासणी करून घ्यावी असे आवाहन इन्फिगो आय केअर हॉस्पिटल मुरबाड चे केंद्रप्रमुख रोहित झुंजारराव व मुरबाड आगाराचे आगार प्रमुख श्री योगेश मुसळे यांनी केले आहे



या अभियानासाठी महाराष्ट्र परिवहन महामंडळ मुरबाड यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. या अभियान राबवल्यामुळे नागरिकांनी इन्फिगो आय केअर व मुरबाड आगाराचे आभार मानून अभियानाचे कौतुक केले आहे.

# मृत्यूनंतरही ‘त्याने’ दिले गरजूंना जीवनदान
## वासिंदच्या ब्रेन डेड रुग्णाचे डोंबिवलीतील एम्स हॉस्पिटलमध्ये अवयव दान

**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता**
**कल्याण** : मेंदूत रक्तस्राव झाल्याने डॉक्टरांनी मृत घोषित केलेल्या वासिंदमधील प्रवीण चन्ने यांचे अवयवदान करण्यात आले आहे. या निर्णयातून चन्ने परिवाराने ग्रामीण भागातील जुनाट रूढी-परंपरांना दूर ठेवून ग्रामस्थांकरिता एक वेगळाच आदर्श निर्माण केला आहे.

कित्येक वर्षांपासून वासिंदमध्ये राहणाऱ्या ४४ वर्षीय प्रवीण रिलायन्स जिओमध्ये नोकरी करत होता. अचानक रक्तदाब वाढल्याने त्याला डोंबिवलीतील एम्स हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले परंतु मेंदूत रक्तस्राव झाल्याने डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. डोंबिवलीतील एम्स हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी अवयवदानाबाबत रुग्णाच्या कुटुंबियांचे समुपदेशन केले. प्रवीणचे वडील अशोक चन्ने यांनी काळजावर दगड ठेवत मुलाच्या आठवणी जिवंत ठेवण्यासाठी अवयवदानाचा निर्णय घेतला.

एम्स हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी अवयवदानाची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर ठाण्यातील ज्युपिटर हॉस्पिटल, डी. वाय. पाटील, पुणे, नानावटी हॉस्पिटल, फोर्टिज हॉस्पिटल, मुलुंड येथील गरजू रुग्णांसाठी प्रवीणचे अवयव देण्यात आले. यात किडनी, फुफुस, डोळे, इतर अवयव दान करण्यात आले. चन्ने परिवाराने स्वतःवर दुःखाचा डोंगर कोसळलेला असताना कित्येक कुटुंबाला आनंद देऊन समाजापुढे नवा आदर्श निर्माण केला आहे.

# दुचाकी व चारचाकी वाहनांना पसंती क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /पेण** : प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरु करण्यात येत आहे. यासाठी ज्यांना दुचाकी व चारचाकी वाहनांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्क भरुन हवे असतील त्यांनी दि.22 एप्रिल 2025 रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी 10.00 ते दुपारी 02.30 या दरम्यान विहित नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या खाजगी वाहन विभागात डीडी, निवासी पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह जमा करावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल यांनी केले आहे. एकाच नंबरकरीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी दि.22 एप्रिल 2025 रोजी सायंकाळी 4.00 वाजता कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येईल. त्यानुसार एकाच नंबरसाठी एकापेक्षा जास्त अर्ज असतील तर त्या अर्जदारांनी त्याची नोंद घेऊन दि.23 एप्रिल 2025 रोजी कार्यालयीन वेळेत दुपारी 2.30 वाजेपूर्वी त्यांच्या इच्छे प्रमाणे जास्तीच्या रक्कमेचा डीडी बंद लिफाफ्यामध्ये कार्यालयात जमा करावा अतिरिक्त धनाकर्षण कमीत कमी 309 रु.चा असावा त्यापेक्षा कमी रकमेच्या धनार्पिणचा विचार केला जाणार नाही. सदर अर्जासाठी त्याच दिवशी दुपारी 3.30 वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी नवीन वाहन नोंदणी विभाग यांच्या दालनात लिलाव करण्यात येईल.

सदर डीडी RTO PANVEL यांच्या नांवे नॅशनलाईज्ड/शेक्युल्ड बँकेचा असावा तसेच तो दोन महिन्यांपेक्षा जास्त जुना नसावा. अर्जादाराने अर्जासोबत पॅनकार्ड व आधारकार्ड साक्षांकित प्रत जोडणे अनिवार्य राहील. लिलावाकरिता जमा करण्यात येणारा डीडी (फक्त एकच डीडी) या सीलबंद पाकीटात जमा करावा. आकर्षक क्रमांकासाठी आलेल्या अर्जासोबत असणारे घनाकर्षण अर्ज स्विकारणाऱ्या दिवसापासून दोन महिन्यापेक्षा जुने असलेलले धनाकर्षणाचे अर्ज बाद केले जातील. तसेच विहित शुल्कापेक्षा कमी रकमेचे असलेले डीडी सुद्धा बाद केले जातील. एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून 180 दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर केले नाही तर राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकारजमा होईल. कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेली फी, कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही अथवा त्याचे समायोजन करता येणार नाही.

आकर्षक क्रमांकासाठी आगाऊ स्वरुपात अर्ज स्विकारत असून चालू मालिका संपल्याशिवाय नवीन मालिका सुरु होणार नाही. तसेच आगाऊ प्रक्रियेमध्ये स्विकारलेल्या अर्जाच्या धनाकर्षण च्या पावत्या, जुन्या मालिकेतील पूर्ण नंबर संपल्याशिवाय नवीन मालिकेतील पावत्या जारी केल्या जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# खर्डीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती संपन्न

## रुग्णालयाला संविधान प्रतिमा भेट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
शहापुर, ता.14 (वार्ताहर)

-डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134 व्या जयंतीनिमित खर्डीतील खर्डी ग्राप सभागृह, पंचशीलनगर, महात्मा फुले कॉलनी,आनंदनगर,मनसे कार्यालय, जिप स्टॅन्ड व खर्डी बाजारपेठेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले.यावेळी रुग्णालयातील कर्मचारी मीनल अहिरे यांनी रुग्णालयाला संविधान प्रतिमा भेट दिली.जयंती उत्सव कमिटी व रुग्णालयातर्फे वतीने खर्डी रुग्णालयात लाडू व फळ रुग्णांना



फळे वाटप केली तर यावेळी सामूहिक संविधान वाचन करण्यात आले. एकता ग्रुप व मुस्लिम ट्रष्ट तर्फे शरबत वाटप करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिक्षक डॉ.आशिलाक शिंदे,उपसरपंच मौसीम शेख,ग्राप सदस्य प्रांजली केदारे,दिनेश सदगीर,फारूक मेमन,अनिल मडके, अतुल चन्ने, उत्सव कमिटीचे अध्यक्ष संजय निकाळे, दीपेश वाघचौडे,नितीन जाधव,दिलीप वाघचौडे,प्रकाश जाधव,मनसेचे सगीर शेख,प्रकाश धाबे,मीनल अहिरे व ग्रामविस्तार अधिकारी मंगल परमार याच्यासाहित अनेक भिमसैनिक आंबेडकर अनुयायी महीला व मान्यवर उपस्थित होते.

# द्रोणाचार्य आणि शिवछत्रपती पुरस्काराने डोंबिवलीतील तरुणांचा सन्मान

क्रीडा क्षेत्रातील द्रोणाचार्य पवन भोईर आणि युवा क्रीडापटू राही पाखले, आदर्श भोईर यांना 'शिवछत्रपती पुरस्कार'



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** क्रीडा क्षेत्रातील अत्यंत मानाचा असलेला 'द्रोणाचार्य पुरस्कार' आणि 'शिवछत्रपती पुरस्कार' हे माझ्या डोंबिवलीकर असलेल्या भोईर जिमखान्याचे संस्थापक पवन भोईर आणि युवा क्रीडापटू राही पाखले, आदर्श भोईर यांना मंगळवारी जाहीर झाले, त्यामुळे तो माझ्या डोंबिवलीकरांचा अभिमान आहे. शहराच्या शिरपेचात क्रीडा क्षेत्रात यामुळे आणखी एक मानाचा तुरा खोवला गेल्याची भावना भाजपाचे प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केली.

चव्हाण यांनी पवन भोईर यांच्या घरी जाऊन 'द्रोणाचार्य पुरस्कारा'ने त्यांना सन्मानित केले जाणार असल्याने त्यांचा आणि डोंबिवलीकर राही पाखले, मूळ डोंबिवलीकर आदर्श अनिल भोईर यांना जिमनॅस्टिकमधील ट्रॅम्पोलीन या खेळासाठी महाराष्ट्र शासनाचा 'शिवछत्रपती पुरस्कार' जाहीर झाला याबद्दल या दोन्ही युवा खेळाडूंचा भाजपा परिवार आणि डोंबिवलीकर नागरिकांचा प्रतिनिधी या नात्याने यथोचित सन्मान केला.

त्यावेळी माध्यमांना चव्हाण यांनी सांगितले की, "हा सन्मान मिळाला याचा मला या शहराचा प्रतिनिधी म्हणून खूप आनंद झाला आहे. भोईर जिमखाना जेव्हा सुरू झाला, तेव्हापासून आजपर्यंत यशस्वी वाटचाल सुरू आहे. आपल्या शहराचे राष्ट्रीय खेळाडू अशी ख्याती असलेले आणि खेळावर मनापासून प्रेम करणाऱ्या स्व. सुरेंद्र वाजपेयी सरांची आज आठवण येते, त्यांना विद्यार्थी खेळात प्रावीण्य मिळवून आला की, खूप आनंद वाटायचा. त्यांनी समाजामधून उत्तमोत्तम खेळाडू होण्याचे स्वप्न बघितले होते. त्यांनी लावलेल्या रोपट्याचे आता वटवृक्षामध्ये रूपांतर झाले आहे, याचाही मला मनस्वी आनंद आहे."

डोंबिवलीकर राही पाखले, मूळ डोंबिवलीकर आदर्श अनिल भोईर यांना जिमनॅस्टिकमधील ट्रॅम्पोलीन या खेळासाठी महाराष्ट्र शासनाचा 'शिवछत्रपती पुरस्कार' जाहीर झाला आहे, तसेच त्यांचे गुरू पवन भोईर यांना 'द्रोणाचार्य पुरस्कार' जाहीर झाला आहे. पुण्यात १८ एप्रिल रोजी म्हाळुंगे बालेवाडी क्रीडा संकुलात हा सोहळा संपन्न होणार असून माननीय राज्यपालांच्या हस्ते त्याचे वितरण होणार आहे. भोईर, पाखले यांच्या कुटुंबीयांनी देखील हा अविस्मरणीय क्षण नजरेत टिपण्यासाठी वर्षानुवर्षे प्रचंड कष्ट घेतले आहेत, त्या सगळ्यांचे चव्हाणांनी मनापासून अभिनंदन केले. 'माझे डोंबिवलीकर माझा अभिमान' असल्याचे चव्हाण यांनी यावेळी पुन्हा सांगितले. तसेच त्या सर्व खेळाडूंना भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# कारंजा बंदरातील गाळ काढण्याची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** मुंबईच्या ससून बंदराला पर्याय म्हणून उरणच्या करंजा येथे नवे मच्छीमार बंदर उभारण्यात आले आहे. मात्र दोन वर्षांच्या आतच या बंदरात गाळाची समस्या निर्माण होऊ लागली आहे. त्यामुळे भरती-ओहटीच्या वेळी मासेमारी बोटी हाताळण्यात अडथळे निर्माण होत आहेत. महाराष्ट्र फिशरमन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मार्तंड नाखवा यांनी महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाकडे गाळ काढण्याची मागणी केली आहे.

१५ ऑगस्ट पासून करंजा मच्छीमार बंदरातून मासळी खरेदी-विक्री सुरू झाली आहे. या नऊ महिन्यांच्या कालावधीत बंदरातून ३०० कोटीं पेक्षा अधिक मासळीची निर्यात झाली आहे. ही मासळी अमेरिका, चीन तसेच आशिया व युरोप खंडातील अनेक देशात निर्यात करण्यात आली आहे. तर दुसरीकडे मासळी बंदर आणि त्यावर आधारित विविध प्रकल्पांमुळे करंजा परिसरात विविध प्रकारच्या छोट्या-मोठ्या लघु उद्योगांत वाढ होत चालली आहे. त्यामुळे येथील स्थानिक बेरोजगारांना बऱ्यापैकी रोजगारही उपलब्ध होऊ लागला आहे. त्यामुळे येथील मच्छीमारांना लाभ झाला आहे. त्याच बरोबरीने स्थानकांच्याही व्यवसायात भर पडली आहे.

राज्यातील सात सागरी जिल्ह्यांतील सर्वात मोठे मच्छीमार करंजा गाव म्हणून ओळखले जाते. राज्यातील सर्वाधिक सुमारे ६५० मच्छीमार बोटी याच करंजा गावात मासेमारी करतात. राज्यातील सर्वात मोठी मच्छीमार सहकारी संस्थांही करंजातच आहे. वार्षिक सुमारे १०० कोटींची उलाढाल असलेल्या या मच्छीमार संस्थेच्या माध्यमातून डिझेलमागे एक पैसा आणि बर्फाच्या विक्रीमागे एक रुपया विकास निधी वसुल करुन शाळा, हॉस्पिटलची उभारणी केली आहे. अशा सर्वाधिक मासेमारी करणाऱ्या करंजा मच्छीमारांच्या शेकडो बोटी मासळी उतरविणे, विक्रीसाठी मुंबईतील एकमेव ससुनडॉक बंदराच्या आश्रयाला जात होते. त्यामुळे ससुनडॉक बंदरावरील वाढता ताण लक्षात घेऊनच करंजा येथेच उपयुक्त जागेत सुमारे २०० कोटी खर्चाचे एक हजार मच्छीमार बोटी क्षमतेचे अद्यावत करंजा मच्छीमार बंदर उभारण्यात आले आहे. या बंदरात आमदार महेश बालदी यांच्याहस्ते १५ ऑगस्ट पासून मासळी बाजार सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे हे करंजा बंदर हजारो मच्छीमारांसाठी वरदान ठरले आहे.

> **करंजा बंदरातील गाळ काढण्याची मागणी मच्छीमारांनी केली आहे. त्याचा प्रस्ताव तयार करून मत्स्यव्यवसाय विभागाला देण्यात येणार आहे. यात प्रथम गाळाची तपासणी केली जाईल त्यानंतर येणाऱ्या अहवाल वरून गाळ काढण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येईल.**
> ● सुधीर देवरे, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड

# म्हारळ ग्रामपंचायत उपसरपंचपदी जेष्ठ सदस्य लक्ष्मण कोंगेरे यांची निवड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण तालुक्यातील शहरीकरण झालेली म्हारळ ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी म्हारळपाडा येथील ग्रामपंचायतीचे जेष्ठ सदस्य लक्ष्मण गोविंद कोर्गिरे यांची बिनविरोध निवड झाली, यामुळे सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ,सर्व सदस्य यांच्या सह परिसरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.कल्याण तालुक्यातील एक महत्त्वाची ग्रामपंचायत म्हणून म्हारळ ग्रामपंचायत ओळखली जाते,१७सदस्य असलेल्या या ग्रामपंचायतीने आतापर्यंत विकास कामावर लाखोंचा खर्च केला आहे. अशा या ग्रामपंचायतीचे माझी उपसरपंच योगेश देशमुख यांनी राजीनामा दिल्याने हे पद रिक्त झाले होते, त्यामुळे आज या रिक्त उपसरपंच पदासाठी केवळ लक्ष्मण



गोविंद कोंगेरे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी अमोल मुरबाडे यांनी त्यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर केले, यानंतर सरपंच निलिमा नंदू म्हात्रे, माझी सरपंच व विद्यमान सदस्य प्रमोद देशमुख, योगेश देशमुख, अँड दिपक अहिरे, मोनिका गायकवाड, नंदा म्हात्रे,विकास पवार, अमृता देशमुख, प्रकाश चौधरी, मंगला इंगळे,बेबी सांगळे प्रगती कोंगेरे,अनिता देशमुख, किशोर वाडेकर, वेदिका गंभीरराव आणि अश्विनी देशमुख यांच्या सह ग्रामपंचायत अधिकारी अमोल मुरबाडे व यांचे कर्मचारी अशा सर्वांनी उपसरपंच लक्ष्मण कोंगेरे यांचे शाल ,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

तसेच पत्रकार संजय कांबळे यांनी ही त्यांना शुभेच्छा दिल्या. आम्ही सर्व सदस्य एकमेकांच्या सहकार्याने गावाच्या विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे नवनियुक्त उपसरपंच लक्ष्मण कोंगेरे, सरपंच श्रीमती निलिमा म्हात्रे, सदस्य प्रमोद देशमुख यांनी सांगितले

# पर्यावरण रक्षणासाठी डहाणू जिल्हा परिषद शाळेत बीजगोळे उपक्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कासा :** डहाणू तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा लिलकपाडा शाळेतील विद्यार्थी, शिक्षक यांनी पर्यावरणाच्या संरक्षणासाठी पुढाकार घेतला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, शनिवार, रविवार अशा सलग तीन दिवस आलेल्या सुट्टयांचा सदुपयोग करत या शाळेतील विद्यार्थ्यांनी तीन दिवसात २६ हजार बीजगोळे (सिडबॉल) तयार करून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. पृथ्वीवरील वृक्षांची विविध कारणांनी वृक्षतोड होऊन पर्यावरणाचा ह्रास होत चालला आहे. त्यामुळे अतिवृष्टी, तापमानवाढ, असमान पर्जन्यमान अशी नैसर्गिक संकटे निर्माण होत आहेत. या संकटावर एकमेव उपाय म्हणजे पुन्हा एकदा झाडांची संख्या वाढली पाहिजे. निसर्गाचं मुद्दल नाही, पण व्याज तर देऊ, हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवत डहाणू तालुक्यातील विविध जिल्हा परिषद शाळा लिलकपाडा या शाळेत पर्यावरण रक्षणासाठी बीजगोळे उपक्रम राबवण्यात आला. सीडबॉल्स म्हणजेच बीजगोळे. बियाणे, चिकणमाती आणि माती अथवा खताच्या लहान गोळ्यांमध्ये बियाणे करून बीजगोळे तयार केले जातात. नांगर किंवा इतर शेती उपकरणांनी जमीन तयार न करता बियाण्यांपासून झाडे वाढवण्याची ही जुनी पद्धत आहे.

# दोन वर्षे उलटूनही वसईतील मंजूर झालेले धूप बंधारे कागदावरच



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** वसईच्या किनार पट्टीची होणारी धूप व लाटांच्या तडाख्याने किनार पट्टीच्या भागातील होणारे नुकसान टाळण्यासाठी धुप्रतिबंधक बंधारे तयार केले जाणार होते. मात्र दोन वर्षे उलटूनही धूपबंधक बंधाऱ्यांची कामे मार्गी लागत नसल्याने मंजूर झालेले बंधारे केवळ कागदावर राहिले असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

वसई पश्चिमेच्या भागात विस्तीर्ण समुद्र किनारे आहे. या किनार पट्टीच्या भागात ही मोठ्या संख्येने नागरिक राहत आहेत. धुप्रतिबंधक बंधारा नसल्याने किनारपट्टीच्या भागात राहणाऱ्या नागरिकांना गेल्या अनेक वर्षांपासून विविध समस्यांना सामोरे जावे लागते. विशेषतः पावसाळ्यात व भरतीच्या वेळी या किनारपट्टीच्या भागात मोठमोठ्या लाटा किनाऱ्यावर आदळतात याचाच फटका हा किनाऱ्यालगत असलेल्या घरांना बसतो. त्यातच बेसुमार वाळू उपसा, कचरा, किनाऱ्यालगत असलेली सुरुची झाडे भरतीच्या पाण्यामुळे नष्ट झाली आहेत.

तर दुसरीकडे बंधारा नसल्याने पाणी थेट समुद्र किनाऱ्यावरील विविध भागात घुसून किनाऱ्यावरील घरे, शेती, बागायती, वाळत ठेवलेली मासळी यांचे मोठे नुकसान होते. यासाठी या भागात धुप्रतिबंधक बंधारे तयार करण्यात यावे अशी सातत्याने नागरिकांमधून करण्यात येत होती. यासाठी वसईच्या किनार पट्टीच्या भागात कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत धूपप्रतिबंधक बंधाऱ्यांची कामे मंजूर करण्यात आली होती.

यात विशेषतः भुईगाव, रानगाव, पाचूबंदर लांगेबंदर, नवापूर अशा समुद्र किनाऱ्याच्या समावेश आहे. यासाठी चारही बंधारे मिळून ३० कोटी इतका निधी ही मंजूर केला आहे. मात्र मागील दोन वर्षांपासून येथील धूपप्रतिबंधक बंधाऱ्यांची कामे मार्गी लागत नसल्याचे येथील नागरिकांनी सांगितले आहे.

वसईच्या भागाला यापूर्वी सुद्धा तौक्ते यासह इतर चक्रीवादळाचा मोठा फटका बसला आहे. यात मोठे नुकसान झाले होते. तशी स्थिती पुन्हा निर्माण होऊ नये यासाठी धूपप्रतिबंधक बंधारे संरक्षक भिंत म्हणून अतिशय महत्त्वाचे असल्याचे सामाजिक कार्यकर्ते मॅकेन्झी डाबरे यांनी सांगितले आहे. गावकरी व पर्यावरण प्रेमी यांनी मागील ३-४ वर्षांपासून भुईगाव व समुद्र किनारी संरक्षक बंधारा बांधला जावा यासाठी तहसीलदार, प्रांत, महानगर पालिका, जिल्हाधिकारी, मेरीटाईम बोर्ड आदी ठिकाणी अनेकदा पाठपुरावा केला परंतु काहीही हालचाल झाली नसल्याचा आरोप डाबरे यांनी केला आहे. शासनाने मोठ्या वादळाची वाट न पाहता जे बंधारे मंजूर आहेत त्यांची कामे मार्गी लावावीत अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### शेती व सुरुच्या झाडांची वाताहत

हवामान बदलामुळे मागील २-३ वर्षापासून प्रचंड भरतीचे प्रमाण वाढले आहे. सोबत किनारपट्टी व पाणथळ भागात वाढत असलेली अतिक्रमण यामुळे समुद्राचे पाणी किनारा सोडून शेती व सुरुच्या बागेत घुसत आहे. भुईगाव समुद्र किनारी सुरुची हजारो झाडे भरतीच्या पाण्याचे शिकार झाली आहेत. भरतीचं पाणी शेतीत घुसल्याने शेतीवर याचा परिणाम जाणवू लागला आहे.

# स्मशानात अंधार ; मोबाइलच्या उजेडात अंत्यसंस्कार

## उरण नगरपरिषदेचे दुर्लक्ष

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** शहरातील परिसरात बोरी, भवरा आणि मोरा या तीन स्मशानभूमीत अनेक असुविधा आहेत. या तिन्ही ठिकाणी अंत्यसंस्कार करताना नागरिकांना आपल्या प्रियजनांना गमावल्याचे दुःख तर असतेच, पण त्यांना अखेरचा निरोपही नीट देता येत नसल्याचे शल्यही असते. स्मशानभूमी परिसरात पसरलेला अंधार, नादुरुस्त सरण आणि परिसरातील अस्वच्छता, गळके छप्पर यामुळे संताप व्यक्त केला जात आहे. शुक्रवारी शरीरातील मोरा येथील भवरा स्मशानभूमीतील वीज गायब झाली आहे. त्यामुळे मोबाइलच्या उजेडात मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याची वेळ मृतांच्या नातेवाईकांवर आली होती. या अंत्यसंस्काराचे छायाचित्र व्हायरल झाले. या घटनेमुळे हाच का विकास असा प्रश्न नागरिकांकडून केला जात आहे. उरणच्या भवरा गावातील शशिकांत हुमणे यांचे शुक्रवारी आकस्मिक निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा भवरा स्मशानभूमीकडे निघाली. मात्र स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम अर्धवट झाल्यामुळे नातेवाईकांना काळाकुट्ट अंधार, दगडधोंडे तुडवत स्मशानभूमीकडे जावे लागले. स्मशानभूमी गाठल्यानंतर त्या ठिकाणी वीज नसल्याचे समोर आले. अखेर मोबाइलच्या उजेडात नातेवाईकांना अंत्यसंस्कार करावे लागले. त्यामुळे नागरिकांनी उरण नगर परिषदेच्या विरोधात नाराजी व्यक्त केली.

या स्मशानभूमीत त्या दिवशी अंधार होता. येथे वीज वाहिनी आणि दिवे आहेत. मात्र येथील वीज वहिनी समाजकंटकानी तोडल्याने वीज नव्हती. याची खात्री करून घेतली आहे. पुढील काळात शहरातील स्मशानभूमीची पाहणी करून सुविधा उपलब्ध केल्या जातील. - समीर जाधव, मुख्याधिकारी, उरण नगर परिषद

### गर्दुल्ल्यांचा अड्डा

**खाडी किनाऱ्यावर असलेली ही स्मशानभूमी गर्दुल्यांचा अड्डा बनली आहे. रात्री उशिरापर्यंत दारुडे समूहाने बसतात. या दारुड्यांनी स्मशानभूमीतील बल्ब चोरले. शिवाय सर्व वायरींची नासधूस केली. त्यामुळे गेल्या दीड महिन्यापासून स्मशानभूमीत वीज नाही. त्यामुळे या गर्दुल्यांचा बंदोबस्त करा अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.**

# मुंबईतच्या तापमानात चढ-उताराचे संकेत




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** शहर तसेच उपनगरात पुढील काही दिवस तापमानात चढ-उतार होतील. तसेच आर्द्रता अधिक असल्यामुळे उष्मा मोठ्या प्रमाणात जाणवेल. मात्र, सध्या तीव्र उष्णतेची म्हणजेच 'उष्णतेच्या लाटे'ची शक्यता नाही. त्यामुळे काही दिवस तरी माफक दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

सध्या मुंबईत मोठ्या प्रमाणात उकाडा जाणवत आहे. कमाल तापमान जरी कमी असले तरी वातावरणातील आर्द्रतेमुळे बैचेन होते. मुंबईतील तापमानात बुधवारी २ अंशांनी घट झाली. मात्र, दिवसभर उकाड्यामुळे मुंबईकर हैराण झाले होते. संपूर्ण दिवस उकाडा आणि मधूनच उन्हाचा चटका यामुळे पुन्हा उष्णतेची लाट येते की काय ही चिंता नागरिकांना सतावू लागली आहे. परंतु जरी या काही दिवसांत मुंबईत उष्मा वाढला, तापमानात वाढ झाली तरी उष्णतेच्या लाटेची शक्यता नसल्याचा अंदाज खासगी हवामान अंदाजकांनी व्यक्त केला आहे.

### आर्द्रतेचा वैताग

सध्या मुंबईत आर्द्रतेचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे तापमानात घट झाल्यानंतरही उष्मा जाणवत आहे. मुंबई, तसेच उपनगरांत पुढील तीन – चार दिवस कमाल तापमान ३१ ते ३३ अंश सेल्सिअस दरम्यान असेल. मात्र आर्द्रतेचे प्रमाण ८० ते ८५ टक्क्यांदरम्यान राहण्याची शक्यता आहे. यामुळे विशेषत: सकाळी व सायंकाळी अधिक घालमेल होऊ शकते.

आर्द्रता ही बाहेरील वातावरणात साधारण ३० ते ७० टक्क्याच्या दरम्यान असते. ४५ ते ५५ टक्के ही सापेक्ष आर्द्रता बहुतांश लोकांसाठी सुखद मानली जाते. मात्र, मुंबईत ही आर्द्रता सध्या ७० टक्क्यांच्या पुढे आहे. त्यामुळे मुंबईचे दिवसभराचे तापमान जरी कमी असले तरी आर्द्रतेमुळे असह्य उष्मा सहन करावा लागत आहे.

# 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात कृषी आणि मृदा विज्ञान तज्ज्ञ विजय कोळेकर यांची मुलाखत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. १७ :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प-२ ची अंमलबजावणी' या विषयावर नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे कृषी विद्यावेत्ता आणि मृदा विज्ञान तज्ज्ञ विजय कोळेकर यांची मुलाखत प्रसारित होणार आहे.

'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार, २२ एप्रिल २०२५ रोजी रात्री ८.०० वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार आहे. तसेच महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवर खाली दिलेल्या लिंकवरून ही मुलाखत पाहता येणार आहे.

- एक्स - https:// twitter. com/ MahaDGIPR,
- फेसबुक - https:// www. facebook. com/ MahaDGIPR,
- यू ट्यूब - https:// www. youtube.co/MAHARASHTRADGIPR,

निवेदिका सुचेता गरूडे यांनी ही मुलाखत घेतली आहे.

हवामान बदलांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी शेतकऱ्यांना जुळवून घेण्यास सक्षम करणे आणि शेती व्यवसाय किफायतशीर करण्यास साहाय्य करणे या उद्देशाने राज्यात 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प' राबविण्यात येत आहे. राज्यात 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प-२' राबविण्यात येत असून सर्व दुष्काळग्रस्त भागांची पाहणी करण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना पाणी



आणि हवेच्या परिस्थितीनुसार शेती करणे तसेच शेतविषयक नवीन संशोधनाचा उन्नत शेतीसाठी उपयोग करणे, पाण्याचा कार्यक्षम वापर वाढवणे, शेतीतील कर्ब उत्सर्जन कमी करणे आणि पौष्टिक तृणधान्य उत्पादनावर भर देणे इत्यादी बाबींवर प्रामुख्याने भर देण्यात येणार आहे. राज्यात या प्रकल्पाची अंमलबजावणी याविषयी या प्रकल्पाचे कृषी विद्यावेत्ता तथा मृदा विज्ञान तज्ज्ञ श्री. कोळेकर यांनी 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात माहिती दिली आहे.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com



# केडीएमसी सफाई कर्मचाऱ्यांना खेळांद्वारे विरंगुळा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मुख्यालयाच्या हजेरी शेड सफाई कामगारांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वी जयंती तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांची 395 व्या जयंती निमित्त कामगारांन साठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये मोठ्या उत्साहात महिला कर्मचारी तसेच पुरुष कर्मचारी यांनी सहभाग घेतला. नेहमीच ताण तणावाच्या जीवनापासून ऐक दिवस मुक्त होऊन लहान पणाच्या आठवणींना उजाळा देऊन स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धा संपन्न करण्यासाठी भीमदास जाधव, हरीश परमार, संतोष गायकवाड, मिलिंद भालेराव, तसेच मुख्यालय हजेरी शेडचे संपूर्ण कर्मचारी वर्ग यांनी खूप मेहनत घेतली.

# एमडीची तस्करी करणाऱ्यास इराणी वस्तीतून अटक

## पोलीस उप आयुक्त विशेष कारवाई पथक व खडकपाडा पोलीस स्टेशनची कामगिरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : एमडी पावडरची तस्करी करणाऱ्या आरोपीला अटक करण्याची कामगिरी पोलीस उप आयुक्त विशेष कारवाई पथक व खडकपाडा पोलीस स्टेशनच्या पथकाने केली आहे. हाशमी जाफर हुसैन जाफरी, ( ३३ , रा. इराणी नगर, अटाळी) असे या आरोपीचे नाव असून त्याच्याकडून तीस हजार रुपये किमतीचे 15 ग्रॅम एमडी पावडर जप्त करण्यात आली आहे.

कल्याण परिमंडळ ३ च्या विशेष कारवाईचे पथकाचे अधिकारी व खडकपाडा पोलीस ठाणेतील पोलीस निरीक्षक गुन्हे व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अटाळी परिसरात बेकायदेशीर अंमली पदार्थ विक्री करणारे पेडलर व अभिलेखावरील पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेवून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याकरीता



खाजगी वाहनांवरून प्रतिबंध गस्ती करीता रवाना झाले होते. हे पथक बुधवारी संध्याकाळच्या सुमारास कल्याण बंदरपाडा कडून शिवमंदिरकडे जाणाऱ्या गावठाण रोड या ठिकाणी आले असता या ठिकाणी पोलीस पथकास रोडच्या कडेला उभ्या असलेल्या एका काळया रंगाची सुझुकी कंपनीची ऍक्सेस स्कुटीवरील इसमाच्या हालचाली संशयीत वाटल्या. तेंव्हा पोलीस पथकाने त्याचा पंचासमक्ष अंगझडती पंचनामा करण्यात आला असता त्याच्या ताब्यातुन १५ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एम. डी.) सुमारे ३० हजार किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन हाशमी जाफर हुसैन जाफरी याला खडकपाडा पोलीस ठाणे येथे अटक करण्यात आली आहे. पुढील तपास चालु असून या आरोपीवर महात्मा फुले पोलीस ठाण्यात दोन आणि मानपाडा पोलीस ठाण्यात एक असे यापूर्वी तीन गुन्हेही दाखल आहेत.

हि कामगिरी पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, सहायक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे, खडकपाडा पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. विजय नाईक, स.पो. नि. अनिल गायकवाड, स.पो.उपनिरी. जितेंद्र ठोके, पो.शि. अमित शिंदे, खुशाल नेरकर, राहुल शिंदे, पोलीस उप आयुक्त विशेष कारवाई पथक, तसेच खडकपाडा पो.स्टेशनचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी स.पो.नि. विजय गायकवाड, अंमलदार पो. शि. अनंत देसले, सतिष मुपडे यांनी केली आहे.

# कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस हरित- महासिटी कंपोस्ट ब्रँड वापरण्यास परवानगी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात जवळपास 800 ते 1000 टीपीडी इतका कचरा दैनंदिन निर्माण होत असून या कच-याचे महापालिकेमार्फत दैनंदिन संकलन करुन प्रक्रियेकरीता महापालिकेमार्फत उभारण्यात आलेल्या कचरा व्यवस्थापन केंद्रावर पाठविण्यात येतो. महापालिका क्षेत्रातील निर्माण कच-यावर प्रक्रिया करण्याकरीता विविध ठिकाणी प्रकल्प उभारणी करण्यात आलेली असून त्यापैकी मौजे उंबर्डे, कल्याण पश्चिम येथे 350 टीपीडी क्षमतेचा व मोठागाव, डोंबिवली येथे 100 टीपीडी क्षमतेचा प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. या ठिकाणी संकलीत केलेल्या ओल्या कच-यावर प्रक्रिया करुन खत निर्माण करण्यात येत आहे. या खताचा महापालिका क्षेत्रातील तसेच लगतच्या ग्रामीण भागतील शेतकरी वर्ग तसेच नागरीक यांना लाभ मिळावा हया हेतुने प्रकल्पाच्या ठिकाणी निर्माण करण्यात येत असलेल्या खताचे नमुने तपासणी करीता महाराष्ट्र शासनाच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी या प्रयोगशाळेमध्ये पाठविण्यात आले होते. त्यानुसार खताचे नमुने परिक्षणानंतर खत वापराकरीता योग्य असल्याबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतर कच-यावर प्रक्रिया करुन तयार होणा-या सेंद्रिय खताची विपणन व विक्री करण्यासाठी हरित –महासिटी कंपोस्ट हा शासनाचा नोंदणी कृत ब्रँड वापरण्याची परवानगी मिळण्यासाठी प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ महाराष्ट्र संचालनालय, मुंबई येथे सादर करण्यात आलेला होता.

या प्रस्तावाची छाननी होवून खत तपासणी अहवाल एफसीओ मानकांनुसार असल्याचे दिसून आल्याने, स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी विकास अभियान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्यातर्फे कल्याण डोंबिवली महानगरपालिका नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाअंतर्गत निर्मित कंपोस्ट खताच्या विक्री व विपणनासाठी हरित महासिटी कंपोस्ट हा शासनाचा नोंदणीकृत वापरण्यासाठी परवानगी देण्यात आली असून "हरित- महासिटी कंपोस्ट" ब्रँड एक वर्षासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांना प्रदान करण्यात आला आहे.

यामुळे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रकल्पावर निर्माण होणाऱ्या खताची विपणन व विक्री करणे शक्य होणार असून यामुळे महापालिकेच्या उत्पन्नात भर पडण्यास मदत होणार आहे. तसेच याचा फायदा हा महापालिका क्षेत्रातील तसेच लगतच्या ग्रामीण भागातील शेतकरी व इतर नागरीक यांना देखील होईल.

## डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे

# माणगांव उपजिल्हा रुग्णालयास वैद्यकीय उपकरणे वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बोरघर : डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा तालुका अलिबाग यांच्या तर्फे माणगाव उपजिल्हा रुग्णालयास बुधवार दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत २५ लाख रुपये किमतीचे विविध वैद्यकीय उपकरणे यांचे वाटप गांधी मेमोरियल हॉल निजामपूर रोड माणगाव येथे घेण्यात आलेल्या भव्य कार्यक्रमात करण्यात आले. प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे रायगड जिल्ह्यात सर्वत्र विशेष कौतुक होत आहे.

माणगाव हे मुंबई गोवा राष्ट्रीय महा मार्गावरील तालुक्याचे मध्यवर्ती ठिकाण असून या ठिकाणी प्रशस्त असे उपजिल्हा रुग्णालय आहे. या रुग्णालयात महामार्गावर घडणाऱ्या अपघातातील जखमींना औषोधोपचारा साठी दाखल करण्यात येते. तसेच दक्षिण रायगड जिल्ह्यातील माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर आदी तालुक्यांतून गरीब रुग्ण औषोधोपचारा साठी येत असतात. या ठिकाणी गरिबांना चांगली सेवा मिळावी हा उद्देश नजरे समोर ठेऊन सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून समाजात काम करणाऱ्या नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे या माणगाव उपजिल्हा रुग्णालयास वैद्यकीय उपकरण यांचे वाटप करण्यात आले. सदरचे उपकरणे रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ.महेश मेथा यांच्या कडे तालुक्याचे तहसीलदार दशरथ काळे, माणगाव नगर पंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी,माणगाव उपविभागीय कार्यालयाचे कर्मचारी श्री.पाचाडकर,उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. मृणालीनी वाढवळ, डॉ.सानप, लता राठोड, परिचारिका शिवकांती गवळी ,शर्मिला गोडबोले,संजय देसाई यांच्या उपस्थितीत श्री सदस्य सुरेश वाढवळ,संदीप खरंगटे,नितीन बामगुडे,नितीन वाढवळ,अपर्णा वाढवळ यांनी केले. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना माणगाव तालुक्याचे तहसीलदार मा श्री.दशरथ काळे साहेब यांनी नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करताना प्रतिष्ठानने माणगाव उपजिल्हा रुग्णालयास दिलेल्या आवश्यक अशा वैद्यकीय उपकरणांचा गरीब जनतेला निश्चितच याचा फायदा होणार असून हे प्रतिष्ठान वेगवेगळे उपक्रम सामाजिक दायित्वातून समाजासाठी राबवित असल्याचे सांगितले. रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ.महेश मेथा यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलताना डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानने माणगाव उपजिल्हा रुग्णालयास वस्तुरूपी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले आहे. आम्ही जी यादी दिली होती त्यापेक्षा अधिक साहित्य आमच्या रुग्णालयास प्रतिष्ठानतर्फे देण्यात आले आहे. या रुग्णालयात आपण श्री सदस्यांना जे काही सहकार्य लागेल ते देण्यासाठी आम्ही सहकार्य करू असे सांगितले. प्रास्ताविकात बोलताना आदर्श शिक्षिका अपूर्वा जंगम यांनी रायगड जिल्ह्यात रेवदंडा येथे डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या रूपाने ज्ञान सूर्य उगवला असल्याचे सांगितले. त्यांच्या गौरवशाली घराण्यातून प्राप्त झालेल्या समाजसेवी वसेचा संकल्प पुढे त्यांनी सिद्धीस नेला. या प्रतिष्ठानतर्फे वृक्षारोपण,मोफत आरोग्य शिबीर,रक्तदान शिबीर,रक्तगट तपासणी शिबीर,उद्योजकता स्वयंसेवा मार्गदर्शनपर शिबीर,गरजूना श्रवण यंत्राचे वाटप,बस थांबे पाणपोई, निवारा शेड,वनराई बंधारे,विहीर , धरण, तलाव सार्वजनिक पाणवठे स्वच्छता,बोअरिंग,विहीर ,शैक्षाणिक साहित्य वाटप,पोलिसांना साहित्य वाटप,नैसर्गिक आपत्ती वाटप,प्लाजमा डोनेशन शिबीर,स्मशानभूमी परिसर स्वच्छता अशी अनेक समाजोपयोगी उपक्रम यशस्वीपणे व लाखो श्री सदस्यांच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणात राबविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास हजारोंच्या संख्येने श्री सदस्य उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन आदर्श शिक्षिका अपूर्वा जंगम यांनी करून उत्साहात हा कार्यक्रम संपन्न झाला.

## कल्याणातील सर्वात वर्दळीच्या चौकात

# फिरत्या ट्रॅफिक सिग्नलचा अनोखा प्रयोग

### महिन्याभराच्या अभ्यासानंतर बसवण्यात येणार कायमस्वरूपी सिग्नल यंत्रणा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवलीतील वाहतूक कोंडीची समस्या लक्षात घेऊन त्यावर मार्ग काढण्याच्या दृष्टिकोनातून कल्याण पश्चिम येथील सर्वात वर्दळीच्या सहजानंद चौकामध्ये महापालिका आणि वाहतूक पोलीस प्रशासनातर्फे फिरत्या ट्रॅफिक सिग्नलचा अनोखा प्रयोग करण्यात येत आहे. सहजानंद चौकात असलेल्या ५ रस्त्यांचा विचार करता याठिकाणी " सोलर बेस पोर्टेबल स्टँड अलोन सिग्नल यंत्रणा" प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली आहे. पुढील महिनाभर ही सिग्नल यंत्रणा कार्यान्वित ठेवून त्यातून येणाऱ्या निष्कर्षानंतर अभ्यास करून महापालिकेतर्फे याठिकाणी कायमस्वरूपी सिग्नल यंत्रणा बसविण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेच्या विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली.

कल्याण पश्चिमेतील आग्रा रोड हा प्रमुख मार्ग असून दररोज याठिकाणाहून हजारो वाहनांची वर्दळ सुरू असते. या मार्गावरील दुर्गाडी चौक, लालचौकी, सहजानंद चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बैल बाजार इ. प्रमुख चौकात वाहतूक नियंत्रणाचे काम मोठे जिकिरीचे आहे.

या पार्श्वभूमीवर स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत सहजानंद चौकात कायमस्वरूपी सिग्नल यंत्रणा उभारण्यात येणार आहे. मात्र इथल्या वाहतुकीचा, वर्दळीचा आणि



वाहनांच्या संख्येचा अभ्यास न करता ही सिग्नल यंत्रणा बसवली गेल्यास पालिकेचा पैसा वाया जाऊ शकतो. शहरातील नागरिकांच्या कराचा हा पैसा विचारात घेऊन कायमस्वरूपी सिग्नल यंत्रणा बसविण्यापूर्वी त्याचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने ही सोलर बेस पोर्टेबल स्टँड अलोन सिग्नल यंत्रणा प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली आहे.

पुढील एक महिनाभर त्याद्वारे इथल्या वाहतुकीचा अभ्यास करण्याबरोबरच त्यासोबतच कोणते रस्ते वन वे करणे, कोणता डिव्हायडर मागे घेणे, कोणता हायमास्ट शिफ्ट करणे आदी बाबींचा विचारही केला जाणार आहे आणि मग त्यानंतर या चौकाच्या आणि इथल्या वाहतुकीच्या अनुषंगाने कायमस्वरुपी सिग्नल यंत्रणा बसविण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेच्या विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली आहे.

## मुरबाडमध्ये राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत

# शेतकऱ्यांना दिले प्रशिक्षण!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील मौजे देवगाव येथे नुकताच जिल्हा परिषद शाळेमध्ये केंद्र सरकारद्वारे सुरू करण्यात आलेले राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत तालुका कृषी अधिकारी मुरबाड कार्यालय मार्फत व प्रकल्प संचालक आत्मा ठाणे रामेश्वर पाचे व प्रकल्प उपसंचालक मनाली तांबडे यांच्या मार्गदर्शनाखाली मुरबाड तालुक्यात ८ क्लस्टर मध्ये ५० हेक्टर प्रती क्लस्टर याप्रमाणे १२५ प्रती क्लस्टर शेतकरी निवड करून प्रती क्लस्टर दोन कृषी सखी मुरबाड मधील शेतकऱ्यांसाठी एक नवीन आणि आशादायक भविष्य घेऊन आले आहे. या मिशनचा उद्देश रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर कमी करून नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देणे आहे.

नैसर्गिक शेतीमुळे जमिनीची



सुपीकता वाढते, पाण्याची बचत होते आणि पर्यावरणाचे संरक्षण होते. याव्यतिरिक्त, नैसर्गिकरित्या पिकवलेले अन्न अधिक पौष्टिक आणि आरोग्यदायी असते, ज्यामुळे ग्राहकांनाही फायदा होतो.

राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत, शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचे प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच, त्यांना आवश्यक असलेले जैविक खते आणि निविष्ठा तयार करण्यासाठी आर्थिक आणि तांत्रिक सहाय्य पुरवले जात आहे. बाजारपेठेशी जोडणी करून देण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी चांगला भाव मिळू शकेल.

या मिशनच्या माध्यमातून, भारत सरकार शाश्वत शेती पद्धतींना प्रोत्साहन देत आहे, जेणेकरून केवळ आजच्याच नव्हे, तर भावी पिढ्यांसाठीही शेती आणि पर्यावरण सुरक्षित राहील. नैसर्गिक शेतीकडे वळणे हे शेतकऱ्यांसाठी एक फायद्याचे आणि देशाला प्रगतीकडे नेणारे पाऊल आहे. शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि नैसर्गिक शेती पद्धतींचा अवलंब करून समृद्ध आणि आरोग्यदायी भविष्य निर्माण करावे, असे आवाहन राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन जनजागृती कार्यक्रम वेळी मंडळ कृषी अधिकारी मुरबाड संदीप केणे,कृषी पर्यवेक्षक वेखंडे,कृषी सहायक गोरक्षनाथ मंडलिक, बीटीएम गोकुळ जाधव, एटीएम मधुकर कुर्ले यांच्या मार्फत करण्यात आले.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषि सखी स्वाती शेळके व .विनया तुपे यांनी विशेष सहकार्य केले.

## रायगड जिल्ह्यात

# राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार रायगड जिल्ह्यात दि.10 मे 2025 रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोल अ. शिंदे यांनी दिली आहे.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जिल्ह्यातील सर्व न्यायालयात प्रलंबित असलेली, दिवाणी आणि तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे, विवाह विषयक प्रकरणे तसेच ग्रामपंचायतीच्या घरपट्टी व पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, वीजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर वित्तीय संस्थांच्या थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येतात.

दि.10 मे 2025 रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि अधिकाधिक नागरिकांनी या लोक अदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड, अलिबाग ए. एस. राजदेकर यांनी केले आहे.

# सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबीराचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : समाजाचे आपणास काहीतरी देणे लागते म्हणून मंडळाचे सहकारी हेमंत नवार यांनी सामाजिक बांधिलकी जपावे रक्तदान शिबीराची संकल्पना मंडळाचे सभासदांसमोर मांडली. त्यानुसार एकता सार्वजनिक मित्र मंडळ व कै. वामनराव ओक रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज व प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीचे औचित्य साधून सावरकर नगर, म्हाडा वसाहत येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कार्याध्यक्ष रामचंद्र माने (मामा), अध्यक्ष सचिन विशे, सचिव राकेश कदम, खजिनदार मिलींद मोरे व सर्व सभासद पदाधिकारी यांनी रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. परिसरातील तरुणांनी शिबीरामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन रक्तदान केले.

## जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे

# भाजप सरकार विरोधात कॉँग्रेसचे निषेध आंदोलन!



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी कॉँग्रेस नेत्या सोनियाजी गांधी व विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्या विरोधात मोदी शासनाने द्वेषपूर्ण व सुडबुद्धीच्या भावनेने कारवाई करण्याचा घेतलेला निर्णय हा लोकशाहीला घातक आहे. या अन्यायकारक निर्णयाच्या विरुद्ध कॉँग्रेस पक्षाने लढा सुरू केला असून आज जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे येथे ठाणे शहर जिल्हा व ठाणे ग्रामीण जिल्हा कॉँग्रेसच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार ठाणे शहर जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाण व ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे यांनी आयोजित केलेल्या या आंदोलनाला राष्ट्रीय सचिव तथा कोकण प्रभारी वेंकटेश यांच्यासह ठाणे शहर, ठाणे ग्रामीण जिल्हा, कल्याण शहर जिल्हा, भिवंडी शहर जिल्हा व उल्हासनगर शहर जिल्हा मधील कॉँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लावण्या सातपुते हिला राज्य स्तरावर कराटे स्पर्धेत कांस्य पदक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : येथील सरस्वती विद्यालयाची विद्यार्थिनी लावण्या सदाशिव सातपुते इयत्ता दहावी हिने पंधरा वर्ष वयोगटा मध्ये कांस्य पदक मिळवून यश प्राप्त केले आहे.

मार्शल आर्ट स्पोर्ट्स अकॅडमी, ठाणे आयोजित राज्य स्तरीय कराटे स्पर्धा भाटिया हॉल कोपरी ठाणे येथे पार पडली त्यामध्ये सरस्वती विद्यालयाची इयत्ता दहावीतील



विद्यार्थिनी लावण्या सदाशिव सातपुते हिने 15 वर्ष वयोगटा मध्ये कांस्य पदक मिळवून शाळेचे नाव लौकिक केले आहे.

लावण्या सातपुते व क्रीडा शिक्षक (कराटे प्रशिक्षक) दौलत चव्हाण, क्रीडा प्रमुख सुनील ठाकरे यांचे विद्या विकास मंडळाचे चेअरमन विठ्ठल सातवी, सचिव रविंद्र शेलार व संचालक मंडळ तसेच शाळेचे प्राचार्या मिना कांबळे, उपप्राचार्य सुरेश सापळे, पर्यवेक्षक वासुदेव भोईर, काळूराम धनगर यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. HISTORY, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY, M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024